# सशस्त्र पोलीस शिपाई भरती सन २०२२-२३
## लेखी परीक्षेकरीता पात्र उमेदवारांना सुचना

१. राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.४, नागपुरच्या आस्थापनेवरील सशस्त्र पोलीस शिपाई यांच्या २४२ रिक्त पदे भरण्याकरीता शारिरीक मोजमाप व मैदानी चाचणी प्रक्रीया दिनांक ०५/०७/२०२४ रोजी पुर्ण झाली असुन लेखी परीक्षेकरीता १:१० प्रमाणकानुसार एकुण ३२०३ उमेदवार पात्र झाले असुन सदर उमेदवारांची यादी http://www.maharashtrasrpf.gov.in व http://www.mahapolice.gov.in या संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

२. सशस्त्र पोलीस शिपाई भरती २०२२-२३ लेखी परीक्षा दिनांक २१/०७/२०२४ रोजी दुपारी १२:०० वाजता घेण्यात येणार असुन त्याबाबतचे प्रवेशपत्र महाआयटी कंपनी, मुंबई यांचेकडुन वाटप करण्यात येणार आहे. त्याप्रमाणे उमेदवारांना परीक्षाकेंद्रावर सकाळी १०:०० वाजता हजर राहणे अनिवार्य आहे. **सकाळी १०:०० वाजता नंतर परीक्षा केंद्रावर येणा-या उमेदवारांना कुठल्याही परिस्थितीमध्ये परीक्षा केंद्राच्या आत प्रवेश देण्यात येणार नाही याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

३. लेखी परीक्षे करीता येणाऱ्या उमेदवारांनी MAHA IT यांनी दिलेले परीक्षेबाबतचे प्रवेशपत्र तसेच मैदानी चाचणीच्या वेळी देण्यात आलेले प्रवेशपत्र असे दोन्ही प्रवेशपत्र उमेदवारांकडे असतील तरच परिक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येईल.

४. उमेदवारांचे स्वत:चे वैध फोटो आयडी (उदा.पॅन कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड, वाहन चालक परवाना) सोबत असने अनिवार्य आहे.

५. उमेदवार यांनी कोणत्याही प्रकारचे पेन, मोबाईल फोन, डिजीटल वॉच, डायरी, मायक्रोफोन, ईअर फोन किंवा कोणतेही प्रकारचे इलेक्ट्रॉनिक डिव्हाइस तसेच नोट्स व पुस्तके परीक्षा केंद्रच्या आत सोबत घेवून येता येणार नाही याची नोंद घ्यावी

६. उमेदवारांनी परीक्षा केंद्रामध्ये एकदा प्रवेश केल्यानंतर परीक्षा संपेपर्यंत कुठल्याही परीस्तिथीमध्ये परीक्षा केंद्राच्या बाहेर जाता येणार नाही यांची नोंद घेण्यात यावी.

७. परीक्षा केंद्राच्या आवारात मित्र, नातेवाईक, पालक व अन्य अनाधिकृत व्यक्तीस प्रवेश देण्यात येणार नाही याची उमेदवारांना नोंद घ्यावी.

८. लेखी परीक्षेकरीता येतांना उमेदवारांनी स्वत:चे एक पासपोर्ट साईज छायाचित्र सोबत आणावे.

९. परीक्षा केंद्रावर अथवा परीक्षा केंद्राच्या परीसरात कुठलाही अनुचित प्रकार घडणार नाही या करीता परीक्षा केंद्रावर खोलीनिहाय व्हीडीओ रेकॉर्डींग करण्यात येणार आहे तसेच ओळख पटण्याकरीता प्रत्येक उमेदवारांची बायोमॅट्रीक्स घेण्यात येणार असुन डमी उमेदवार आढळुन आल्यास तसेच परीक्षे दरम्यान गैरवर्तन करतांना आढळुन आल्यास उमेदवारास लेखी परीक्षे करीता अपात्र ठरविण्यात येईल व योग्य ती आवश्यक कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल यांची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

**१०. लेखी परीक्षेदरम्यान उमेदवार आपसात बोलतांना आढळल्यास सदरचा प्रकार नकल करीत असल्याचे समजुन दोन्ही उमेदवारांना त्याक्षणीच पुढील पुर्ण प्रक्रीयेकरीता अपात्र ठरविण्यात येईल. याची सर्व उमेदवार यांना नोंद घ्यावी.**

(डॉ.प्रियंका नारनवरे)
समादेशक
राज्य राखीव पोलीस बल गट क्र.४,नागपूर

F:\Police bharti latters.docx